अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# आता शेतीउद्योगासाठीही आपत्ती व्यवस्थापन हवे

शेतकऱ्याला कोण झोडपून काढत नाही. वादळी पावसापासून ते अवकाळी गारपिटीपर्यंत राजकारण्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत सगळेच शेतकऱ्याला झोडपून काढत असतात. त्याने कष्ट करावे आणि अगदी सहजपणाने सुखासमाधानाने त्याला उत्पन्न मिळावे असे फार क्वचित घडते. आपला देश शेतीप्रधान असूनही शेतकऱ्याच्या नशिबी येणारी ही अवहेलना अत्यंत चिंताजनक ठरते. निसर्गाचा लहरीपणा एकवेळ समजून घेतला पाहिजे. परंतु मानवनिर्मित संकटे त्याला आणखीनच अडचणीत आणत असतात. आज जवळपास निम्म्या महाराष्ट्रामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीने थैमान घातले. द्राक्ष, गहू, हरभरा, संत्र, आंबा या सगळ्या पिकांना या गारपिटीने अक्षरशः जमीनदोस्त केले आहे. मराठवाड्यात आपल्या डोळ्यांनी आपले हे नुकसान पाहू न शकणाऱ्या दोन शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली. अचानकपणे कोसळलेल्या या जोरदार गारपिटीने आठ जणांचे बळी घेतले. उभे पीक आडवे झाल्यामुळे शेतकऱ्यांना जो फटका बसला आहे तो त्यांची सगळीच आर्थिक गणिते उद्ध्वस्त करणारा ठरतो. निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय पक्षांचे या नैसर्गिक संकटाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. मुळात हे राज्यकर्ते सामाजिक भावनेने राज्य करत नाहीत. सत्ता आणि आपल्या तिजोऱ्या भरण्यासाठी त्यांना राजकारणाचा डाव खेळायचा असतो. आता निवडणुका जाहीर झाल्यामुळे सगळीकडे आचारसंहिता लागू झाली आहे. गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना भेटून त्यांच्यासाठी कोणतीही मदत जाहीर करता येणार नाही आणि मुळात त्याचा राजकीय फायदा उठवता येणार नाही हे लक्षात आल्यामुळे मुख्यमंत्र्यांपासून ते विरोधी पक्षांपर्यंत एकालाही गारपीटग्रस्त शेतकऱ्याची भेट घेण्याची साधी इच्छाही झालेली नाही. जर एखाद्या राजकीय नेत्याचा पिंड जर सामाजिक कार्याचा असता तर त्याने निवडणुकीच्या धामधुमीपेक्षा या नुकसानीचे महत्त्व ओळखले असते. ज्याला खरोखर समाजाविषयी कळकळ असते तोच सत्तेचा किंवा आपल्या पदाचा वापर सामाजिक कार्यासाठीच करतो. आपले राजकीय नेते व्यापारी प्रवृत्तीचे आहेत यात आम्हाला काहीच शंका वाटत नाही. स्वार्थासाठी शेतकऱ्याला किंवा सामान्य माणसाला वाऱ्यावर सोडायला त्यांना कधीही लाज वाटत नाही.

### राजकारण्यांमध्ये शेतीविषयी आस्था नाही

महाराष्ट्राला आतापर्यंत जे काही राज्यकर्ते मिळाले ती सगळी शेतकऱ्यांची मुले होती. खरे तर त्यांना हा प्रश्न जास्त महत्त्वाचा वाटला पाहिजे. शेतकऱ्याचे शेतीचे प्रश्न त्यांच्या अडीअडचणी सोडवताना त्यांना मनोमन समाधान वाटायला हवे. ग्रामीण भागातून आलेले राजकीय नेतृत्व शेतकऱ्याचा वारसा टिकवणारे असले पाहिजे. शेती आणि शेतकरी हे त्याच्या अंत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न ठरले पाहिजेत, परंतु निवडून आल्यानंतर आपल्या गावाकडे आणि आपल्याच बरोबरच्या शेतकऱ्यांकडे ते पाठ फिरवतात. सत्तेचा वारा लागल्यावर त्यांची तोंडे शहरातल्या उद्योगपतींची आणि व्यापाऱ्यांची स्तुती करायला लागतात. आज ज्या महाराष्ट्रामध्ये सत्तर टक्के जनता ग्रामीण भागात राहते. शेतीवर उपजीविका करते. आजही महाराष्ट्रामध्ये शेतमजुरांची सर्वाधिक संख्या आहे. ग्रामीण भागातला बराच मोठा रोजगार शेती आणि त्याच्याशी पूरक उद्योगातून निर्माण होतो. अशी ही सगळी वस्तुस्थिती असताना नेमका शेतकऱ्यालाच वेठीला धरण्याचा कृतघ्न प्रकार होत राहतो. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात कोणताही उद्योग भरभराटीला नेण्यासाठी सरकारी पातळीवर अनेक प्रकारच्या योजना आखल्या जातात. तशा प्रकारच्या प्रचंड सवलती सरकारकडून दिल्या जातात. उद्योगांपुढे आर्थिक संकट उभे राहिले तर त्यांना आर्थिक पॅकेज दिले जाते. त्यांना तोट्यातून बाहेर काढण्यासाठी सरकारी पातळीवर जो काही आटापिटा चालतो तो पाहिल्यावर याच पध्दतीने सरकार जर शेती उद्योगासाठी झटले तर कितीतरी परिवर्तन घडून येईल. शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा. असे नेहमी म्हटले जाते. पण हा दर्जा केवळ भाषणे ठोकून मिळणार नाही. यासाठी ठोस धोरण आखावे लागेल. आज ज्याप्रमाणे शेती विक्रीतून सर्वप्रकारच्या उद्योगांना तातडीने मदत दिली जाते तशी शेतकऱ्याला मिळत नाही. त्याला मागणीच करावी लागते. खरे तर आजच्या या वेगवान युगामध्ये नैसर्गिक आपत्तींशी सामना करण्याकरता अत्यंत वेगवान अशी तातडीची आपत्ती व्यवस्थापनाची यंत्रणा आखली जाते.आमचे म्हणणे असे आहे की, शेती उद्योगासाठी अशाच प्रकारच्या आपत्ती व्यवस्थापनाची निर्मिती झाली पाहिजे. अतिवृष्टी महापूर, चक्रीवादळ, गारपीट अशा कारणांमुळे शेतीवर काही संकट आले तर या व्यवस्थापन नियंत्रणेने तिथे तातडीने धावून गेले पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा प्रकारच्या नैसर्गिक संकटांची आगाऊ माहितीसुध्दा दिली पाहिजे. शेती आणि शेतकरी अजूनही या आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानापासून वंचित ठेवला गेल्याचे दिसून येते.

### शेतकऱ्यांसाठी कॉरिडॉर का नाही?

महाराष्ट्राच्या विदर्भ,मराठवाडा,उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात झालेले हे गारपिटीचे तांडव समजून घेण्यासाठी सरकारी यंत्रणेला किती वेळ लागेल याचा काहीच भरवसा नाही. भविष्यकाळात अशा प्रकारचे संकट ओढवले तर सरकारकडे तातडीची उपाययोजना असणे गरजेचे ठरते. आजच्या निवडणुकीच्या काळात मतांची टक्केवारी मोजणारे सत्ताधारी नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी धावत पळत जातील अशी शक्यता दिसत नाही. यावरून आपल्या देशातल्या राजकारण्यांचा हा विकृत चेहरा नजरेत भरल्याशिवाय राहात नाही. आचारसंहितेमुळे बिथरण्याचे काहीच कारण नाही. निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत घेता येऊ शकते. फक्त तशा प्रकारची तळमळ आणि कळकळ राज्यकर्त्यांमध्ये असायला हवी. शेती ही परंपरागत पध्दतीने होते. शेतकरी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत नाहीत.अशा प्रकारचा आरोप त्यांच्यावर वारंवार केला जातो. परंतु राज्यकर्त्यांनी तरी शेतीसाठी कोणते मोठे दिवे लावले आहेत. ते सुध्दा शेतीला सापत्न वागणूक देतात. मुंबई ते दिल्ली, मुंबई ते कलकत्ता, उद्योगांसाठी कॉरिडॉर निर्माण केला जातो. पण शेतकऱ्यांसाठी कोणताच कॉरिडॉर अस्तित्वात येत नाही उलट त्याला बेदखल केले जाते. त्यांच्या चांगल्या जमिनी कमी किमतीत लुबाडल्या जातात. भारताच्या उन्नतीसाठी शेतकऱ्यावर येणाऱ्या या छोट्या छोट्या संकटांचा विचार झालाच पाहिजे.